नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ३०/०७/२०२६

**पुणे महानगरपालिका**
**मा.महिला व बालकल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. ०७**

**महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार, दि.०४/०८/२०२६ रोजी दुपारी ३:३० (तीन वाजून तीस मिनिटे) वाजता समिती सभागृह नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.**
**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ९४**
**मा. सुमय्या मेहबूब नदाफ यांचे दि.१६/०७ /२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र.१३ मधील कैलास स्मशानभूमी परिसरात बायो-मेडिकल वेस्ट प्रोसेसिंग प्लांट कार्यरत असून, या परिसरात शाळा, महाविद्यालये तसेच दाट लोकवस्ती आहे. बायो-मेडिकल कच-याच्या प्रक्रियेमुळे दुर्गंधी, प्रदूषण व संसर्गजन्य आजारांचा संभाव्य धोका निर्माण होण्याची भीती नागरिक, विद्यार्थी, महिला व बालकांमध्ये व्यक्त होत असून, याबाबत परिसरातील नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत आहेत.

तसेच, कैलास स्मशानभूमी ही परिसरातील लाखो नागरिकांसाठी उपलब्ध असलेली एकमेव स्मशानभूमी आहे. येथे दररोज मोठ्या प्रमाणावर अंत्यविधीसाठी नागरिकांची ये-जा होत असते. मात्र बायो-मेडिकल वेस्ट प्रोसेसिंग प्लांटमुळे स्मशानभूमीच्या जागेवर मर्यादा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मृतदेह घेऊन येणाऱ्या नागरिकांसाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. तसेच अंत्यविधीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नातेवाईक व नागरिकांना बसण्यासाठी किंवा थांबण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

महिला, बालके, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच कैलास स्मशानभूमीमध्ये आवश्यक सुविधा विकसित करण्यासाठी सदर बायो-मेडिकल वेस्ट प्रोसेसिंग प्लांट लोकवस्ती, शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक वापराच्या ठिकाणांपासून दूर, शासनाच्या नियमांनुसार योग्य व सुरक्षित ठिकाणी तातडीने स्थलांतरित करणे आवश्यक आहे.

**विषय क्र. ९५**
**मा. सौ.तन्वी प्रशांत दिवेकर व मा. सौ. कोमल समीर शेंडकर यांचे दि.१७/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

सद्य परिस्थिती मध्ये लहान मुलांवरती होणारे अत्याचार संबंधित मुलांना संरक्षण प्रबोधन करण्याकरीता पुणे मनपा हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व शाळांमध्ये संरक्षण प्रबोधन विषय कार्यशाळा हा उपक्रम राबवण्यात यावा. हा उपक्रम राबवल्यास सध्या लहान मुलांवरती होत असलेल्या अत्त्याचार काही प्रमाणात कमी होऊ शकतो त्यांच्यात साक्षरता प्रमाण वाढू शकते तसेच योग्य त-हेने मुलांना समजून देण्यासाठी हा उपक्रम आहे, तरी आपण सदर उपक्रम पुणे मनपा हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शासकीय व निमशासकीय सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबवावा.

१. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग याचा GR क्रमांकः संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८८/एस.डी.४.

२. महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग याचा GR क्रमांक: POSCO-२०१२/प्र.क्र.२१४ (भाग २)/ का-३.

**विषय क्र. ९६**

**मा. सौ.अल्पना गणेश वरपे यांचे दि.२१/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

पुणे शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक प्रभावी बनविण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. केवळ स्वच्छता यंत्रणा कार्यरत असून उपयोग नाही, तर प्रत्येक नागरिकामध्ये स्वच्छतेबाबत जबाबदारीची भावना निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

यासाठी "स्वच्छ पुणे संकल्प" अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत Information, Education and Communication (IEC) उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावेत,

**या उपक्रमांतर्गत पुढील बाबींचा समावेश करण्यात यावा :**

-घराघरांत जाऊन स्वच्छतेबाबत जनजागृती.

-कचऱ्याचे ओले व सुके असे स्रोतस्थानी वर्गीकरण करण्याबाबत मार्गदर्शन.

-प्लास्टिकमुक्त परिसर, सार्वजनिक स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत अभियान.

-महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ, शाळा व महाविद्यालयांचा सहभाग.

-शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेविषयक कार्यशाळा, शपथ, रैली व प्रबोधन कार्यक्रम.

-भित्तीचित्रे, पोस्टर्स, माहितीपत्रके, डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया व एलईडी स्क्रीनद्वारे प्रचार.

-प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात नियमित स्वच्छता जनजागृती सप्ताह आयोजित करणे.

- उत्कृष्ट स्वच्छता राखणाऱ्या सोसायट्या, संस्था, शाळा व बचत गटांचा गौरव करून नागरिकांना प्रोत्साहन देणे.

या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत कायमस्वरूपी जागरूकता निर्माण होईल, कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल तसेच "स्वच्छ पुणे- सुंदर पुणे" हा संकल्प प्रत्यक्षात साकार करण्यास मोठी मदत होईल.

त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत "स्वच्छ पुणे संकल्प" अंतर्गत नियोजनबद्ध IEC जनजागृती उपक्रम शहरभर राबविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. ९७**

**मा. सौ.अर्चना तुषार पाटील व मा. भक्ती गायकवाड यांचे दि.२२/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

पुणे महानगरपालिका महिला व बाल कल्याण समिती व समाज विकास विभाग यांच्या मार्फत पुणे शहरामध्ये स्मार्ट टॉयलेट संकल्पना राबविण्यात येत आहे. या संकल्पनेनुसार प्रभाग क्र २२ क काशेवाडी मधील पुढील प्रमाणे सार्वजनिक सुलभ शौचालय हे स्मार्ट टॉयलेट करण्यात यावे.

१) कै. जनरल अरुण कुमार वैद्य स्टेडियम शेजारील शौचालय

२) रामोशी गेट भवानी पेठ येथील मुतारी

३) कै. चंदूमामा सोनावणे हॉस्पिटल समोरील रासकर प्लॉट येथील शौचालय

४) डायसप्लॉट कॅनल लगत वस्ती मधील शौचालय.

**विषय क्र. ९८**

**मा.ऐश्वर्या पाटील व मा. पूजा जागडे यांचे दि.२३/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र. ०३ मधील यमुनानगर व संजय पार्क परिसरामध्ये महिलांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असून, सार्वजनिक स्वच्छतागृहे व इतर ठिकाणी सॅनिटरी पॅडच्या सुरक्षित विल्हेवाटीची कोणतीही योग्य व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे वापरलेले सॅनिटरी पॅड परिसरात उघड्यावर किंवा इतरत्र टाकले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी, भटकी कुत्री हे सॅनिटरी पॅड परिसरभर विखुरतात, ज्यामुळे अस्वच्छता निर्माण होऊन संसर्गजन्य रोग पसरण्याचा धोका वाढतो. तसेच अशा दूषित वैद्यकीय स्वरूपाच्या कचऱ्यामुळे प्राण्यांनाही संसर्ग होण्याची शक्यता निर्माण होत असून सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो.

याशिवाय, परिसरात सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन उपलब्ध नसल्यामुळे अनेक महिला वापरलेले सॅनिटरी पॅड ड्रेनेज लाईनमध्ये टाकतात. त्यामुळे ड्रेनेज लाईन वारंवार तुंबून जाम होत असून, दूषित सांडपाणी नागरिकांच्या घरामध्ये तसेच रस्त्यावर येत आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याबरोबरच महानगरपालिकेवर वारंवार ड्रेनेज दुरुस्तीचा अतिरिक्त आर्थिक व प्रशासकीय भार पडत आहे.

सदर नमूद परिसरातील महिला भगिनी तसेच विविध महिला बचत गटांच्या प्रतिनिधींकडून महिलांच्या आरोग्य, स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे.

तरी, सदर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन प्रभाग क्र. ०३ मधील यमुनानगर व संजय पार्क परिसरात आवश्यक संख्येने सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन तात्काळ बसविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**विषय क्र. ९९**

**मा. संदिप बाळासाहेब बेलदरे यांचे दि.२७/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र. ३८ मधील थोरवे महानगरपालिका दत्तनगर जांभूळवाडी रोड येथील दवाखान्यातील डायलेसिस सेंटर सध्या बंद असल्यामुळे किडनीच्या आजाराने ग्रस्त रुग्णांना उपचारासाठी इतर रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे. त्यामुळे रुग्णांना आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून वेळ व खर्चातही मोठी वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर डायलेसिस सेंटर तात्काळ सुरू करण्यात यावे.

तसेच सध्या थोरवे महानगरपालिका दवाखान्याची सेवा वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० इतकी मर्यादित आहे. नागरिकांची वाढती गरज लक्षात घेता दवाखाना सायंकाळी पण ६.०० ते रात्री १०.०० या वेळेतही सुरू ठेवण्यात यावा, जेणेकरून कामगार, नोकरदार, विद्यार्थी व इतर नागरिकांना कार्यालयीन वेळेनंतरही आरोग्य सेवा उपलब्ध होईल.

यासाठी आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, तंत्रज्ञ, सहाय्यक कर्मचारी तसेच इतर आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. १००**

**मा. संदिप बाळासाहेब बेलदरे यांचे दि.२७/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र. ३८ मधील आंबेगाव बुद्रुक येथे असलेला कचरा डेपो दाट लोकवस्तीच्या परिसरात असल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव, प्रदूषण तसेच आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले व विद्यार्थ्यांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत असून पर्यावरणावरही विपरीत परिणाम होत आहे.

सदर कचरा डेपोमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने व परिसरातील जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे. तसेच सुका कचरा व ओल्या कचऱ्याचे डंपिंग होत असल्याने परिसरात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढले आहे तसेच उंदीर घुस यांचे प्रमाण वाढले आहे. हा कचरा डेपो लोकवस्तीपासून सुरक्षित अंतरावरील नियोजित व योग्य जागी तात्काळ स्थलांतरित करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रभाग क्र. ३८ मधील सदर कचरा डेपोचे योग्य त्या ठिकाणी स्थलांतर करण्यास तसेच त्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्यास या समितीची मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १०१**

**मा. सौ.तन्वी प्रशांत दिवेकर यांचे दि. २८/७/२०२६ रोजीचे पत्र.**

पुणे महानगरपलिका महिला व बालकल्याण समिती व समाज विकास विभाग यांच्या मार्फत पुणे शहरामध्ये स्मार्ट टॉयलेट संकल्पना राबविण्यात येत आहे. या संकल्पनेनुसार प्रभाग क्रमांक २०ब शंकरमहाराज मठ–बिबवेवाडी मधील पुढील प्रमाणे सार्वजनिक सुलभ शौचालय हे स्मार्ट टॉयलेट करण्यात यावे.

१) बिबवेवाडी ओटा, रम्यनगरी समोरील सार्वजनिक मुतारी.

२)वसंतबाग सिग्नल येथील मुतारी.

३)ESIC हॉस्पिटल समोरील मुतारी

४)निमंत्रण हॉटेल समोरील सार्वजनिक शौचालय.

५)२७६ ओटा येथील सार्वजनिक शौचालय.

**मा.महा.आयुक्त यांच्या कडून आलेले पत्र**

**विषय क्र. १०२**

कोथरूड येथील प्रभाग क्र.३१ मधील पुणे महानगरपालिकेच्या सुतार हॉस्पिटल येथे शवागर उभारून मिळणेबाबत मा.पृथ्वीराज शशिकांत सुतार, मा.दिनेश महादेव माथवड, मा.वासंती नवनाथ जाधव, मा. ज्योत्सना जगन्नाथ कुलकर्णी यांचे दि.१४/०५/२०२६ रोजीच्या पत्रावर झालेला मा. महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.५२, दि.१८/०६/२०२६ ला अनुसरून मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३२२,दि.२३/०७/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. १०३**

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय, भारतरत्न राजीव गांधी हॉस्पिटल, संजय गांधी रुग्णालय, सुतारदरा दवाखाना, खेडेकर हॉस्पिटल तसेच इतर प्रसूतिगृहातील दवाखान्यामध्ये देखील शवागरे उपलब्ध करून देणेबाबत मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर व मा. रामचंद्र कदम, गटनेता राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यांचे दि.०४/०५/२०२६ रोजीच्या पत्रावर झालेला मा.महिला व बालकल्याण समिती ठरावक्र.४२, दि.१८/०६/२०२६ ला अनुसरून मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/३२१, दि.२३/०७/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १०४**

**मा. किशोर लता विष्णू धायरकर व मा.कु.हिमाली नवनाथ कांबळे यांचे दि.०८/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र. १४ ब, मधील गायकवाड आळी, राम मनोहर लोहिया सोसायटी शेजारी जुने जीर्ण झालेले शौचालय असून, अनेक वर्षापासून ते वापरत नाही. त्यामुळे तेथे रात्रीच्या वेळेस अनैतिक प्रकार घडत आहेत. याबाबत तेथील नागरिक आमचेकडे शौचालय पाडण्याबाबत वारंवार तक्रार करीत आहेत.

तरी सदरचे शौचालय पाडण्यात यावे.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२१/०७/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. १०५**

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्प अंतर्गत बंडगार्डन पूल ते मुंढवा पूल स्ट्रेच १० व ११ मधील नदीच्या उजव्या बाजूकडील कोरेगाव पार्क येथील संगमवाडी टी.पी स्कीम येथील बाधा ठरत असलेले शौचालय पाडणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.१/२७७,दि.१३/०७/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२१/०७/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. १०६**

**मा. ॲड.अब्दुल गफुर अं पठाण यांचे दि.१६/०६ /२०२६ रोजीचे पत्र.**

मा. मुख्य सभा दिनांक २०/०८/२०२५ ठराव क्रमांक १७३ ठरावानुसार पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील संत गाडगे महाराज शाळेजवळ, कोंढवा खुर्द या शाळेबाबत सादर केलेल्या अहवाला मध्ये इंग्रजी माध्यम मनपा शाळा क्रमांक ८२बी व उर्दु माध्यम मनपा शाळा क्रमांक १२२ बी यांचे ताब्यात असून संबंधित मुख्याध्यापक यांनी शालेय इमारतीतील दोन वर्ग खोल्या रिकाम्या असून उर्दु माध्यमिक विद्यालयासाठी उपलब्ध करुन देण्याची लेखी हमी दिलेली असल्याने पुणे महानगरपालिके कडील प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज शाळा कोंढवा खुर्द या शाळेत उर्दू माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वी वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे असे नमुद केलेले आहे.

तथापि पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज कोंढवा खुर्द या शाळेत उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १० वीचे वर्ग सुरु करणे खुप अडचणीचे होत आहे व प्राथमिक विभागाकडे अध्यापनासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत, तथापि सध्या परिस्थितीत मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग यांनी १०० टक्के अनुदानित शाळा रफी अहमद किडवाई माध्यमिक विद्यालयाकडील शिक्षक दररोज अध्यापनासाठी त्या शाळेत उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामुळे संत गाडगे महाराज उर्दु माध्यम शाळा क्र. १२२बी कोंढवा खुर्द या शाळेत सुरु करण्यात आलेले उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वीचे वर्ग रफी अहमद किडवाई उर्दु माध्यमिक विद्यालय या शाळेची भाग शाळा म्हणुन करणे योग्य होईल.

मा.मुख्य सभा दिनांक २०/०८/२०२५ ठराव क्र. १७३ चा फेर विचार करुन पुणे महानगरपालिके कडील प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज उर्दु माध्यम शाळा क्र. १२२बी कोंढवा खुर्द या शाळेत सुरु करण्यात आलेले उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वी वर्ग रफी अहमद किडवाई उर्दु माध्यमिक विद्यालय या शाळेची भाग शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२१/०७/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. १०७**

टी.पी.स्किम ०३ येथील फायनल प्लॉट १३२, संगमवाडी पुणे, येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील म.न.पा. शौचालय काढणे बाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.१/१९०२, दि.१०/०३/२०२६ चे पत्र.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२१/०७/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. १०८**

पुणे मनपाचे माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागांतर्गत शाळा सीएसआर अंतर्गत चालाविणेबाबत मा.शिक्षण समिती, मा. स्थायी समिती व मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/इओ/१९०७,दि.१०/०३/२०२६ चे पत्र.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२१/०७/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**योगिता भोसले**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**